जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील विविध विकास कामांच्या ई-निविदेबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः** निविदा-२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४

बांधकाम भवन, ५ वा मजला, २५ मर्झबान पथ,

फोर्ट, मंत्रालय, मुंबई - ४०० ००१

तारीख : २७ मे, २०२१

वाचा :

१. **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः** मातंसं/नस्ती २०१०/प्र.क्र.३४/३९, दिनांक ०६ ऑगस्ट, २०१०.

२. **शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांकः** संकीर्ण-२०१०/ प्र.क्र.१७२/पंरा-७, दिनांक १९ ऑक्टोबर, २०११.

३. **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः** मातंसं/नस्ती-२०१२/प्र.क्र.२७३/३९, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१४.

४. **शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्रमांकः** निविदा-२०१४/ प्र.क्र.२६०/पंरा-७, दिनांक २७ मे, २०१५.

५. **शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांकः** भांखस-२०२१/ प्र.क्र.८/ उद्योग-४, दिनांक ७ मे, २०२१.

६. **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः** मातंसं ०५४/३१/२०१६/३९, दिनांक ११ मे, २०२१.

प्रस्तावना :

शासकीय कामे, साधन सामुग्रीची खरेदी इत्यादीमध्ये पारदर्शीपणा आणण्यासाठी शासकीय खरेदी कामे इ. करिता, ई-निविदा पद्धतीचा अवलंब करण्याचा निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०६ ऑगस्ट, २०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २६ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये रू.३.०० लक्ष पेक्षा जास्त किंमतीच्या निविदेकरीता ई- निविदा कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे. त्यानुसार ग्राम विकास विभागाच्या दिनांक २७ मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींच्या विविध विकास कामांसाठी रू.३.०० लक्ष व त्यापेक्षा अधिक निविदा मुल्यांच्या सर्व कामांसाठी ई- निविदा प्रणालीचा अवलंब करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

०२. सामान्य प्रशासन विभागाच्या (माहिती तंत्रज्ञान) दिनांक ११ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये, ई-निविदा संदर्भात सामान्य प्रशासन विभागाने दिलेले दिनांक ०६ ऑगस्ट, २०१०,

दिनांक १९ जानेवारी, २०१३ व दिनांक २६ नोव्हेंबर, २०१४ चे आदेश अधिक्रमित करून यापुढे ई-निविदा संबंधी कार्यवाही उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने खरेदी संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

०३. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ७ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये, रू.१०.०० लक्ष (सर्व कर अंतर्भुत करून) व त्यापुढील खरेदीसाठी ई-निविदा पद्धतीचा अवलंब करणे अनिवार्य करण्यात आलेला आहे. त्यास अनुसरून सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ११ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे देण्यात आलेल्या सूचनांस अनुसरून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :**

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २६ नाव्हेंबर, २०१४ च्या शासन निर्णयनुसार व ग्राम विकास विभागाच्या दिनांक २७ मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयात नमुद केल्यानुसार, रू.३.०० लक्ष रकमेवरील जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील विविध विकास कामे ई-निविदा पद्धतीने करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. आता या शासन निर्णयाद्वारे जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील विविध विकास कामांच्या रू.१०.०० लक्ष (सर्व कर अंतर्भुत करून) रकमेवरील कामांकरिता ई-निविदा पद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०५२७१४३४०३५५२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAVIN
DEVICHAND
JAIN

Digitally signed by PRAVIN DEVICHAND JAIN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e86ac5658c4f446f46a56052bf048257ffe4ea09078de9d556ae5babe8adc8b1, pseudonym=37D9D56800E3803E7F4DEAA21F9F7FAB712736F6, serialNumber=481AF6EECE7C1D432D3119135BE703BF6529E7A455A9B17708C677B565D8EE24, cn=PRAVIN DEVICHAND JAIN
Date: 2021.05.27 15:07:12 +05'30'

(प्रविण जैन)
वित्तीय नियंत्रक तथा उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.विरोधी पक्षनेता विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई.
३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) अ.मु.स.(ग्रा.वि. व पं.रा.), बांधकाम भवन, मंत्रालय, मुंबई.
५) सचिव (मु.मं.ग्रा.स.यो.), ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) खाजगी सचिव, मा. मंत्री (ग्रा.वि.) मंत्रालय, मुंबई.

८) खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री (ग्रा.वि.), मंत्रालय, मुंबई.
९) महालेखापाल-१, मुंबई.
१०) महालेखापला-२, नागपूर.
११) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई/नागपूर.
१२) जिल्हाधिकारी, सर्व.
१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१४) कार्यकारी अभियंता (बांध.),जिल्हा परिषद, सर्व.
१५) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) निवड नस्ती, कार्यासन बांधकाम-४, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.